

## माहिती-नभोवाणी खाते; तारेवरची कसरत
## पंतप्रधानांच्या पत्रामुळे एकच खळबळ

*१९ ऑगस्ट १९८५*

केंद्रीय सरकारमधील विविध मंत्रालयांमध्ये सर्वांत नाजूक खाते म्हणजे माहिती व नभोवाणी मंत्रालय. आकाशवाणी, दूरदर्शन ही या खात्याची अंगे, चित्रपटसृष्टीवर त्याची हुकमत. त्यामुळे मंत्रालयात 'ग्लॅमर' आहे हे खरे. परंतु काट्याविना गुलाब नाही, तसे कटकटीविना 'ग्लॅमर' नाही असा सारा प्रकार. कधी काय वाद उद्‌भवेल आणि आफत कोसळेल, याचा नेम नाही. मंत्र्याला तर दूरदर्शन म्हणजे 'दुरून डोंगर साजरे' असेच वाटत असावे. हे मंत्रालय सांभाळायचे म्हणजे तारेवरची कसरतच. प्रसिद्धीचा झोत कधी दाहक बनेल याचा नेम नसल्याने एकूण ही टांगती तलवारच.

तर अशा या दूरदर्शनवरील बातम्या आणि कार्यक्रम याबाबत असमाधान व्यक्त

करणारे एक पत्र पंतप्रधान राजीव गांधी यांनी नुकतेच माहिती व नभोवाणी राज्यमंत्री विठ्ठलराव गाडगीळ यांना पाठवले व त्यामुळे एकच खळबळ उडाली. पंतप्रधान हजारो कामांत व्यग्र असूनही त्यांचे दूरदर्शनवर बारकाईने लक्ष असते, याचा हा ताजा पुरावा. आपल्या सहकारी मंत्र्यांना पी.ए. मार्फत फोन न करता स्वत:च फोन करायची राजीव गांधींची स्टाईल आहे. तेव्हा एखादा कार्यक्रम आवडला किंवा आवडला नाही; तर लगेच धाडकन ते फोन करून गाडगीळ यांना कळवीत असतात. एकदा क्रिकेट सामना दूरदर्शनवरून थेट प्रक्षेपित केला जात होता; त्याच वेळी दुसरे काही महत्त्वाचे सामने चालू होते, पण ते दाखवले जात नव्हते. राजीव गांधींनी फोन करून ते सामनेही दाखवावेत, असे सुचवले व दुसऱ्या चॅनेलवर ते प्रक्षेपित करण्याची तासाभरात सोय झाली.

## जनवाणीत राजीव

सध्या दूरदर्शनवर गाजत असलेला 'जनवाणी' कार्यक्रम ही मूळ कल्पना राजीव गांधी यांचीच. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच त्यांनी गाडगीळ यांना 'जनवाणी' सुरू करण्याची सूचना केली होती. खुद्द राजीव गांधीदेखील या कार्यक्रमात सहभागी होणार असून श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणार आहेत. डिसेंबरच्या सुमारास ते 'जनवाणी'त हजर होणार आहेत.

दूरदर्शनवरील बातम्यांबाबत ते बऱ्याच दिवसांपासून असमाधानी आहेत. सुमारे महिन्याभरापूर्वीच त्याबाबत गाडगीळ यांच्याशी त्यांनी दोनदा चर्चा केली. त्यानंतर त्यांनी गाडगीळ यांना पत्र पाठवले. हे पत्र पाठवल्यावर सुमारे पंधरा दिवसांनंतर प्रसिद्धीला देण्यात आले! हे पत्र प्रसिद्धीला दिल्यामुळे नाना तर्क-कुतर्क व्यक्त केले जाऊ लागले. गाडगीळ यांना पत्र पोचण्यापूर्वीच ते प्रसिद्धीला दिले गेले, अशी अफवा पसरली. हे पत्र म्हणजे गाडगीळ यांच्याबद्दल नाराजी असून त्यांचे खाते बदलणार, अशा बातम्या पिकवण्यात आल्या. या संबंधी मी काही केंद्रीय मंत्री व इंदिरा काँग्रेसचे खासदार यांच्याशी चर्चा केली. पंतप्रधानांनी एका मंत्र्याला लिहिलेले पत्र प्रसिद्धीला देणे याबाबत काहींनी आश्चर्य प्रकट केले. तर या पत्रामुळे विठ्ठलराव गाडगीळ यांना एक प्रकारे पंतप्रधानांनी संरक्षणच दिले आहे, असे एका ज्येष्ठ मंत्र्याने सांगितले.

स्वत:ची व इतर मंत्र्यांची प्रतिमा तयार करण्याची वा वाढविण्याची कामगिरी दूरदर्शनने करायची गरज नाही, असे पंतप्रधानांनी या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे एक प्रकारे गाडगीळ यांना हे संरक्षण मिळाले, असे या ज्येष्ठ मंत्र्यांचे म्हणणे. सध्या अनेक मंत्र्यांकडून आपल्याला दूरदर्शनवर प्रसिद्धी मिळावी, असा दबाव येत असतो; त्यापासून गाडगीळ यांची पंतप्रधानांनी सुटकाच केली, असेही हे ज्येष्ठ मंत्री म्हणाले.

## प्रसिद्धीचा हव्यास

त्यांचा हा मुद्दा पटणारा आहे. प्रसिद्धीचा हव्यास अनेकांना आहे. 'आपले रूप

पाहता दूरदर्शनी, सुख झाले वो साजणी' असे बऱ्याच मंत्र्यांना वाटते. त्यांचे खाजगी सचिव गाडगीळ यांच्या खाजगी सचिवांना फोन करून 'आमच्या साहेबांचा अमुक अमुक कार्यक्रम दूरदर्शनवर दाखवलाच पाहिजे,' असे सांगत असतात. काही खाजगी सचिव तर थेट दूरदर्शन महासंचालकांना फोन करून असे आदेश देतात. एका मंत्र्याचे तर चिरंजीव अशा सूचना दूरदर्शन अधिकाऱ्यांना देत असतात.

प्रणव मुकर्जी अर्थमंत्री होते तेव्हाची गोष्ट आहे. देशभर दूरदर्शनचे जाळे पसरावे, म्हणून कमी शक्तीचे एकतीस ट्रान्समीटर्स देशभर उभारण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळात चर्चेस आला होता. अर्थमंत्री या नात्याने त्यासाठी पैसा द्यायला मुकर्जी का कू करत होते. भाजी-बाजारात घासाघीस करावी त्याप्रमाणे ठीक आहे, चार ट्रान्समीटरसाठी पैसे देतो, वगैरे ते म्हणत होते आणि चर्चा चालू असताना एकदम ते म्हणाले, "दूरदर्शनच्या विस्ताराचा उपयोग काय? मी कलकत्त्याला जेव्हा जेव्हा जातो, तेव्हा दूरदर्शन मला काहीच प्रसिद्धी देत नाही." त्यांच्या या उद्‌गाराने मंत्रीमंडळात एकच हशा पिकला. म्हणजे तुमचे खरे दुखणे हे आहे तर, असा टोला एका मंत्र्याने लगावला आणि अखेर सतरा ट्रान्समीटरसाठी पैसे द्यायला मुकर्जी तयार झाले होते.

## मंत्र्यांचे दडपण

तात्पर्य असे की, माहिती व नभोवाणी मंत्री, अधिकारी यांच्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मंत्र्यांचे सतत दडपण येते. याबाबत अधिकाऱ्यांची मोठी पंचाईत होऊन बसते. प्रसिद्धी न दिली तर मंत्री रागावणार व दिली तर टीका होणार, अशा कात्रीत ते सापडतात. गाडगीळ यांनी पंतप्रधानांशी झालेल्या चर्चेत या बाबीचा उल्लेख केला होता. आता मंत्र्यांच्या प्रतिमेचा उदोउदो करायची गरज नाही, असा पंतप्रधानांनीच आदेश दिल्याने दूरदर्शनने सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

दूरदर्शनवर बातम्या वाचणाऱ्यांनी कसा पोशाख करावा याबाबत पंतप्रधानांनी सूचना दिलेल्या नव्हत्या, असे पंतप्रधानांच्या कार्यालयाने स्पष्ट केले. मग या सूचना दिल्या कोणी, याची चौकशी करता मोठी रंजक माहिती समजली.

## आणि पोशाख

काही महिन्यांपूर्वी परदेशचे एक बडे पाहुणे भारत भेटीला आले होते. त्यांचे आगमन पहाटे २-३ च्या सुमारास झाले. त्यांची विमानतळावरच दूरदर्शनच्या वार्ताहराने मुलाखत घेतली. हा वार्ताहर गबाळ्या पोशाखात गेला होता. त्याची दाढी वाढलेली होती आणि त्याने विचारलेले प्रश्नही सुमार होते. तेव्हा पंतप्रधानांच्या कार्यालयातून दूरदर्शन महासंचालकांना कोणीतरी फोन केला व विदेशी बड्या पाहुण्यांची मुलाखत घेण्यासाठी नीटनेटके कपडे केलेला व विषयाची माहिती असलेला वार्ताहर पाठवायला हवा होता, असे सांगितले. त्यामुळे दूरदर्शनमध्ये गडबड उडाली. मुलाखत घ्यायला गेलेल्या आपल्या प्रतिनिधीच्या पोशाखाकडेदेखील जर पंतप्रधानांच्या कार्यालयाचे लक्ष

असेल; तर दूरदर्शनवरून बातम्या देणाऱ्यांच्या पोशाखावरही त्यांची नजर असणार, असे वाटून दूरदर्शन अधिकाऱ्यांनी स्वत:च निवेदकांच्या पोशाखाबाबत सूचना दिल्या, असे म्हटले जाते. पंतप्रधानांनी केवळ रंगसंगतीबद्दल एकदा मल्लिनाथी केली होती इतकेच.

## वार्ताहरांना प्रशिक्षण

बड्या पाहुण्यांच्या मुलाखतीवेळचा वरील अनुभव लक्षात घेऊन आता दूरदर्शनने आपल्या वार्ताहरांना प्रशिक्षण द्यायचे ठरवले आहे. विदेशी पाहुण्यांची मुलाखत घेणाऱ्याला आपल्या परराष्ट्र धोरणाची, पाहुणा ज्या देशाचा आहे त्याची माहिती असणे आवश्यक आहे, हे आता दूरदर्शनला पटले असून परराष्ट्र खात्यातील तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून वार्ताहरांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच दूरदर्शनवर टवटवीत, नवे प्रफुल्लित चेहऱ्याचे निवेदक दिसावेत, म्हणून येथील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामातील कलाकारांत शोध घेतला जात आहे. बातम्यांच्या बाबतीत विविध घटनांचे अधिक तपशीलवार चित्रण व्हावे, म्हणून खाजगी टी.व्ही. कंपन्यांकडून अशा बातम्यांचे चित्रीकरण खरीदले जाणार आहे. तसेच परिसंवाद, चर्चा, उद्‌घाटने यांचे दर्शन कमी करून लोकांच्या जीवनातील, सामाजिक संदर्भ असलेल्या, भावनाप्रधान घटनांचे दर्शन घडवावे, अशाही सूचना देण्यात आलेल्या आहेत.

## हिंदकेसरीचा प्रश्न

महाराष्ट्रात राज्यसभेवर नुकतेच निवडून आलेले सदस्य 'हिंदकेसरी' मारुती माने यांनी गेल्या आठवड्यात सभागृहात प्रथमच तोंड उघडले खरे; परंतु पैलवानाने कुस्तीच्या आखाड्यात उतरण्याऐवजी पोहण्याच्या तलावावर जाऊन धडकावे, अशी त्यांची स्थिती झाली. माने यांना रेल्वेबाबत प्रश्न विचारायचा होता. सभागृहात त्या वेळी ओरिसातील आदिवासी क्षेत्रातील सामाजिक कार्यक्रमांबाबतच्या प्रश्नावर चर्चा चालू होती. डॉ. श्यामसुंदर महापात्रा यांनी विचारलेल्या प्रश्नांना समाज व महिला कल्याण मंत्री श्रीमती मार्गारेथम चंद्रशेखर उत्तरे देत होत्या. इतक्यात माने उभे राहिले व 'पुण्यापर्यंत जाणारी झेलम एक्स्प्रेस कोल्हापूरपर्यंत का नेत नाही?' असा प्रश्न ते विचारू लागले. त्यामुळे सभागृहात एकदम प्रचंड हशा उसळला. आदिवासींबद्दलच्या प्रश्नात ही एकदम रेल्वेगाडी कोठून घुसली, असे साऱ्यांना वाटले. गोंधळलेले माने खाली बसले. आदिवासींच्या प्रश्नाआधी रेल्वेच्या वाघिणींबाबतचा प्रश्न चालू होता. तो संपून नवा प्रश्न सुरू झाला, हे माने यांच्या ध्यानीच आले नाही आणि तसे वाघिणींच्या प्रश्नातही झेलम एक्स्प्रेसबाबत उपप्रश्न विचारणे विषयाला सोडूनच होते. माने यांच्या शेजारीच नव्या सदस्या श्रीमती प्रतिभा पाटील होत्या व त्या माने यांना असा प्रश्न विचारता येणार नाही, असे समजावून देताना दिसत होत्या.

हा गोंधळ एवढ्यावरच थांबला नाही. आदिवासींच्या प्रश्नानंतर पी. उपेन्द्र (तेलगु

देशम) यांचा रेल्वेची विद्युत इंजिने यासंबंधीचा प्रश्न चर्चेस आला. त्या वेळी सभापती व्यंकटरामन यांनी माने हे नवे सदस्य असून त्यांना काहीतरी रेल्वेसंबंधी विचारायचे आहे हे लक्षात घेऊन त्यांचे नाव पुकारले. तेव्हा माने यांनी विचारणा केली : मैं यह पूछना चाहता हूँ कि झेलम एक्स्प्रेस जो दिल्ली आती है और पूना जाती है, इसको कोल्हापूरतक बढानेके लिए मंत्रीमहोदयके पास कोई योजना है?

खरे तर हा प्रश्नही अप्रस्तुत होता. विद्युत इंजिनांबद्दलच्या मूळ प्रश्नाच्या चर्चेत हा उपप्रश्न उपस्थित होत नव्हता. रेल्वे राज्यमंत्री माधवराव शिंदे यांनी ही गाडी (झेलम) विद्युत इंजिन ओढत नसल्याने हा प्रश्न उपस्थित होत नाही, असे उत्तर दिलेच.

पंतप्रधान राजीव गांधी यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती प्रभा राव यांना हैदराबादला तातडीने बोलावून घेऊन त्यांच्याशी काही महत्त्वपूर्ण बाबींची अलीकडेच चर्चा केली. त्यामुळे राजकीय वर्तुळातील कुतूहल वाढले आहे. पंतप्रधान गेल्या ४ ऑगस्ट रोजी हैदराबाद येथे होते. त्यांनी श्रीमती प्रभा राव यांना मुंबईहून तातडीने बोलावून घेतले. सकाळी आठच्या सुमाराला श्रीमती प्रभा राव यांना पंतप्रधानांच्या साहाय्यकांचा फोन आला व लागलीच साडेदहा वाजताचे विमान पकडून त्या हैदराबादला गेल्या. श्रीमती राव यांची पंतप्रधानांशी मुलाखत झाली तीही विमानात. पंतप्रधान हैदराबादहून रात्री दिल्लीला यायला निघाले. त्यांच्यासमवेत श्रीमती रावही दिल्लीला आल्या. प्रवासात सुमारे पाऊण तास पंतप्रधानांनी श्रीमती राव यांच्याशी महाराष्ट्रातील राजकीय स्थिती व संघटनात्मक बाबी यांवर चर्चा केली. इतके तातडीने श्रीमती राव यांना हैदराबादला बोलावून घेण्यामागे काही महत्त्वाचे कारण असावे, असा तर्क व्यक्त केला जात आहे.

□

**– अशोक जैन**

**('राजधानीतून ... २' या पुस्तकातून)**